M14/1/AXMAR/SP1/MAR/TZ0/XX

22140599

**MARATHI A: LITERATURE – STANDARD LEVEL – PAPER 1**
**MARATHE A : LITTÉRATURE – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1**
**MARATHI A: LITERATURA – NIVEL MEDIO – PRUEBA 1**

Friday 9 May 2014 (morning)
Vendredi 9 mai 2014 (matin)
Viernes 9 de mayo de 2014 (mañana)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a guided literary analysis on one passage only. In your answer you must address both of the guiding questions provided.
- The maximum mark for this examination paper is *[20 marks]*.

INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- N'ouvrez pas cette épreuve avant d'y être autorisé(e).
- Rédigez une analyse littéraire dirigée d'un seul des passages. Les deux questions d'orientation fournies doivent être traitées dans votre réponse.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d'examen est *[20 points]*.

INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un análisis literario guiado sobre un solo pasaje. Debe abordar las dos preguntas de orientación en su respuesta.
- La puntuación máxima para esta prueba de examen es *[20 puntos]*.


© International Baccalaureate Organization 2014

https://xtremepape.rs/

*कोणत्याही **एका** उता-याचे मार्गदर्शक प्रश्नांच्या आधारे वाङ्मयीन विश्लेषण लिहा. उत्तर लिहिताना दोन्ही मार्गदर्शक प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.*

**1.**

**तांडव**

तायो एक भलंमोठं शून्य होऊन बसलेली होती. तिचं असं अवतीभवती कशातच लक्ष नसलं की खुर्चीत पाय वर घेऊन, गुडघ्यात हनुवटी खुपसून ती आपलंच एक बोचकं करून हरवून जायची. एरवीही तशी तायो विनोदीच दिसायला. आता आणखीनच कहर. तोंडाचं बोळकं झालेलं. डोळे विझूविझू करू लागलेले आणि आठवण अशी कुठं हरवलेली. पण अजूनही तायोचा संताप जहाल आणि आपलं खरं आहे हे मनोमनी पटलं की ती एकदम आतूनच बदलून उठते. तेव्हा ती इतकी खरीखुरी आणि ताडमाड वाटणार. अजून या वयातसुद्धा. आता दोन वर्षं झाली की पेन्शन घेऊन तिला. कुठं ती अशीच खोली घेऊन एकटीच राहते. "कुण्णा कुण्णाऽऽशी म्हणून पटायचं नाही हो आमच्या तायोचं—स्वभावच मेला काळतोंडीचा कडक लक्ष्मीचा—सुख नाही लागू देणार की स्वतःलासुद्धा." "कसलं खत्रूड जन्माला आलंय आणि तेसुद्धा माझ्याच कपाळी म्हणते मी," असं तिची आई करवादायची. पण तायोला ढिम्म नाही. तिचं सदाच भांडण मांडलेलं. सगळ्यांना तिचं हे मांडलेलं भांडण दिसलं. तिची नेक, तिचा बरोबरपणा कुणालाच समजला नाही.

तायोचं विचित्रच सगळं. तेराव्या वर्षीच तिनं आपल्याला आवडणा-या एका आपल्यापेक्षा खूप वयस्क माणसाशी लग्न केलं. माणूस घरचा सुखवस्तू. गाण्याचा नादी. तायोलाही गाण्याचा आणि चित्राचा नाद. झालं. तिनं त्या पायी गंगाधरवर जीवच ओवाळून टाकला. तेव्हा तायो काय दिसायची! म्हणजे विनोदीच. पण एकदम कसलं तरी तेज असलेली. अशी ज्योत उगवल्यासारखी. आणि झालंच तर आपल्या गौरी सजवायची गौरी गणपतीच्या दिवसात! जिवंत लक्ष्म्या घरी आल्यात असं वाटायचं. ती एक हौसच हं. जीव ओतून गौरीचं करायचं. त्यांना जेवू-खाऊ घालायचं— "बघ माझं जेवण तिला फार आवडलं. खिरीत बोटं उठलेली दिसणारच तुला. आणि चार करंज्या ठेवल्यास ना तर दुसरे दिवशी तीनच असणार. असणारच. हळदी कुंकवात पाच बोटं ठसठशीत दिसणारच. अगं माझ्या घरी येतातच गौरी." असला विश्वास.

पण संसार जेमतेम तीन वर्षं टिकला असेल नसेल. असला भला दांडगा गडी, पण काय झालंय ते समजायच्या आधीच गप्पगार आणि काय? तायोला नीट कळलं तरी होतं की नाही कुणास ठाऊक. त्यातच मूल आडवं आलं आणि पुरतं जन्माला यायच्या आतच गेलं. पुष्कळ वाटून घेतलं तायोनं. सगळी सासरची नि माहेरची मंडळी जाम सरपटली. आता काय ही वेडीबिडी होणार की काय? आणि मग हिचं करायचं तरी काय? आणि हिला सांभाळणार कोण? सगळ्यांना हिचं ओझं वाटू लागलं आणि तिला शक्यतो टाळायचं—तिच्या जबाबदारीतून मुक्त कसं व्हायचं याची खलबतं दोन्ही मंडळी करत असतानाच तायो नीट उठली. ताठ झाली. आधी घरदार फेकून अनाथ म्हणून शिकली. आणि मॉटेसरीचा कोर्स करून चटकन नोकरीला लागली. तशी इकडच्या आणि तिकडच्या दोन्ही मंडळींनी तिचं तोंड भरून कौतुक करून तिला सांगितलं, "आम्ही आहोत हं तुम्हाला. तुम्ही पोरकं समजू नका." तायो हसली आणि बरं म्हणाली. पण तिनं आपला एकटा जीव सदाशिवाचा संसार मांडला. एका लहानशा खोलीत. तायोच्या त्या एकट्या खोलीत बालकवींची आनंदीआनंद गडे बहरली. तायोची शाळा म्हणजे आजचं एक भलं दांडगं संस्थानच. तिनं स्वतः घडवलं. चोवीस तास राबून. तायोला मुलांची हौस दांडगी. तायो स्वतःच गाणी करायची, चाली लावायची, नाच बसवायची, गोष्टी बनवायची, नाटकं करायची, पुस्तकंच्या पुस्तकं घडवली तिनं. काय अन् काय? आता पेन्शन घेतलंय ना, तरी ते तिचं चालूच असतं.

कमल देसाई, *काळ्या सूर्याखालच्या गोष्टी* (२०१०)



https://xtremepape.rs/

(अ) लेखिकेचा वरील उता-यातून सूचित होणारा तायोविषयीचा दृष्टिकोण काय आहे?

(ब) वरील उता-याच्या रचनातंत्राबाबत काय म्हणता येईल?



https://xtremepape.rs/

**2.**

**शब्द**

शब्द बापुडे केवळ वारा | अर्थ वागतो मनांत सारा ||
नीट-नेटका शब्द-पसारा | अर्थाविण पंगू ||१||
मनामनांचा संगम झाला | हृदया हृत्संदेश मिळाला ||
शब्द बोबडा अपुरा पडला | निरुपम घे गोडी ||२||
शुद्धाशुद्धाकडे बघावे | वैयाकरणीं शब्द छळावे ||
शुष्कबंधनीं का गुंतावे | प्रेमळ हृदयांनीं? ||३||
व्याकरणाचे नियम कशाला | कोण मानतो साहित्याला? ||
उठला जो हृदयास उमाळा | हृदयीं विरमावा ||४||
सुंदर वाक्यें शब्द मनोहर | सरस्वतीचे मंजुळ नूपुर |
ऐकायातें हटून अंतर | बसो पंडितांचें ||५||
ममतेचे दो घांस घ्यावया | प्रेमरसाचे घुटके प्याया |
उत्कंठित-उत्सुक, त्या हृदयां | काय होय त्यांचें ||६||
अशुद्ध वाक्यें शब्द मोडके | अवाच्य अक्षर वर्ण तोटके ||
गोड असे अमृताचे भुरके | होती प्रीतीने ||७||

वासुदेव बळवंत पटवर्धन, *आठवणीतील कविता (१)* (१९८९)

(अ) भावनांच्या आविष्काराविषयी कवी आपणास काय सांगतो?

(ब) या उता-याच्या शब्द आणि प्रतिमांच्या योजनेच्या परिणामाविषयी चर्चा करा.



https://xtremepape.rs/